**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

**ग्रामपंचायत विभाग**

जिल्हा परिषद मुख्य इमारत, चौथा मजला, सातारा – कोरेगाव रोड, सदरबझार कॅम्प, सातारा -४१५००१

दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२९५०४३ ईमेल- vptzpsatara2@yahoo.in


जाक्रं/ग्रापं/कार्या-१/ना.पू.उ./१०२५८/२०२१ दिनांक :१८/११/२०२१

## जाहिर निविदा सूचना

**विषयः-** बेसिक माऊंटेनियरींग प्रशिक्षणांतर्गत सल्लागार संस्था म्हणून विविध प्रकारच्या सेवा पुरविणेबाबत.

वरील विषयान्वये, माऊंटेनियरींग क्षेत्रातील विविध प्रकारच्या सेवा पुरविणा-या तमाम प्रवीण संस्थांना कळविणेत येते की, या विभागांतर्गत सातारा जिल्हयातील जिल्हा वार्षिक योजनेमधून नाविन्यापूर्ण उपक्रमांतर्गत बेसिक माऊंटेनियरींग प्रशिक्षण हा उपक्रम मंजूर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने सातारा, पाटण, वाई, जावली व महाबळेश्वर या तालुक्यातील एकूण ५० प्रशिक्षणार्थी यांना अटलबिहारी वाजपेयी इन्स्टिटयूट ऑफ माऊंटेनियरींग अँड अलाईड स्पोर्टस मनाली (हिमाचल प्रदेश) या प्रशिक्षण संस्थेमधून प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्यानुषंगाने जिल्हास्तरावरुन जिल्हा परिषदेच्या वतीने करावयाच्या खालीलप्रमाणे विविध प्रकारच्या कामांच्या अनुषंगाने विविध सेवा पुरविणेसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवा (पुरवठा ) द्यावयाच्या कामचा तपशिल | कालावधी | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थी यांची प्रवेशपत्रे भरुन घेणे | माहे नोव्हेंबर २०२१ ते मे २०२२ अखेर किंवा प्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतचा कालावधी | ५० |
| २ | त्यासाठी आवश्यक असणारी सर्व फिटनेस प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेणे, | | |
| ३ | प्रशिक्षणार्थी यांची प्रशिक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रं जमा करुन घेऊन त्याचे संच बनविणे | | |
| ४ | प्रशिक्षणाच्या अनुषंगाने या विभागाशी व प्रशिक्षण समन्वयक अटलबिहारी वाजपेयी इन्स्टिटयूट ऑफ माऊंटेनियरींग अँड अलाईड स्पोर्टस मनाली (हिमाचल प्रदेश) यांचेशी सातत्याने समन्वय ठेऊन वेळोवेळी त्यांच्या सुचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही या विभागामार्फत करणे. | | |
| ५ | निवडलेल्या ५० प्रशिक्षणार्थी यांचे मनाली येथील प्रशिक्षण संस्थेच्या पहील्या आणि स्पेशल (स्वतंत्र) प्रशिक्षण वर्गासाठीचे, नियोजन त्यांचेशी समन्वय ठेऊन नियोजन करणे व त्यानुषंगाने आवश्यक प्रशिक्षण फी जानेवारी २०२२ पर्यंत जिल्हा परिषदेकडून प्रशिक्षण संस्थेच्या खात्यावर भरण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे. | | |
| ६ | निवडलेल्या ५० प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षण साहित्य (ॲक्सेसरीज) प्रशिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनानुसार भाडयाने घेणे अथवा खरेदी करणे यासाठीचे जिल्हा परिषदेच्या वतीने सर्व कामकाज करणे. | | |
| ७ | प्रशिक्षणार्थी यांची प्रवेशपत्रे भरुन व त्यास आवश्यक कागदपत्रं जोडून ती प्रशिक्षण संस्थेकडे ऑनलाईन व ऑफलाईन वेळेत सादर करणे | | |

| अ.क्र. | सेवा (पुरवठा ) द्यावयाच्या कामचा तपशिल | कालावधी | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|---|
| ८ | प्रशिक्षणार्थी यांचा विमा काढणे | | |
| ९ | प्रशिक्षणार्थी यांच्या प्रवासासाठीची आवश्यक ती सर्व तयारी करणे | | |
| १० | प्रशिक्षणार्थी यांच्या सातारा ते मनाली व परत मनाली ते सातारा या प्रवासाची सर्व व्यवस्था पाहणे व जबाबदारी पार पाडणे | | |
| ११ | प्रशिक्षणार्थी यांच्या अंतिम निवडीमध्ये आवश्यक तेथे सहभाग नोंदविणे | | |
| १२ | अंतिम निवड केलेल्या प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षणाच्या अनुषंगाने समुपदेशन करणे | | |
| १३ | प्रशिक्षणार्थी यांच्या शारीरीक व मानसिक तयारीसाठी जवळचा ट्रेकिंग कॅम्प आयोजित करणे. | | |
| १४ | प्रशिक्षणार्थी यांच्या प्रशिक्षण साहित्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे | | |
| १५ | उपरोक्त कामांशिवाय (सेवांशिवाय) इतर अनुषंगिक सर्व कामे. | | |

जे कोणी पुरवठादार संस्था उपरोक्त प्रमाणे सर्व सेवा पुरवू इच्छितात, त्यांनी उपरोक्त नमूद कालावधीमध्ये येणा-या वरील व्यवस्थेसाठी सल्लागार संस्था म्हणून काम करण्यास इच्छूक आहेत, त्यांनी याकरीता एकत्रितपणे येणा-या खर्चाचे दरपत्रक (सर्व करांसह) या कार्यालयास दोन (तांत्रिक कागदात्रांचा लखोटा व दरपत्रक लखोटा ) सिलबंद लखोटयामधून खाली सही करणार यांचे नावे **दिनांक** २५ **/११/२०२१** रोजी **दुपारी ३.०० वाजेपर्यंत** समक्ष अथवा पोस्टाने पोहोच करावे.

उपरोक्त दरपत्रके विहीत दिनांकांस व वेळेत अथवा तत्पूर्वी या कार्यालयास प्राप्त न झालेस ती स्विकारली जाणार नाही. एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे.

शक्य झाल्यास प्राप्त होणारी दरपत्रके त्याच दिवशी **सायंकाळी ४.०० वा.** किंवा तदनंतर उपस्थित पुरवठादार यांचे समोर उघडणेत येतील.

**तांत्रिक लखोटयामध्ये समावेश करावयाची कागदपत्रं.**

१) संस्थेचे नोंदणी पत्र
२) कामाचा अनुभव दाखला
३) संस्थेकडे उपलब्ध असणारे प्रवीण मनुष्यबळ याची यादी
४) संस्थेकडे यानुषंगाने उपलब्ध असणारी साधनसामुग्रीची माहिती
५) संस्थेने यापूर्वी आयोजित केलेल्या ट्रेकिंग कॅम्पची माहिती.

१८/११/२१

**(अर्चना वाघमळे )**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)**
**सातारा जिल्हा परिषद सातारा**

**प्रत:-** कार्यालयीन नोटीस बोर्ड, ग्रामपंचायत विभाग जि.प. सातारा
प्रत:- सदर जाहिर निविदा सूचना सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात आली आहे.